**Q.P. Code : 22499**

**(वेळ: $2\frac{1}{2}$ )** **(मार्क: ७५)**

**सुचना:** १) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
२) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

प्र. १ अ) शिलालेख व ताम्रपटांच्या आधारे मराठी भाषेच्या उत्पत्तिकालाविषयी चर्चा करा. १५

**किंवा**

आ) महानुभावीयांच्या चरित्र व तत्वज्ञानात्मक ग्रंथाचा परिचय करुन द्या.

प्र. २ अ) तेराव्या शतकातील एक प्रमुख संप्रदाय म्हणून वारकरी संप्रदायाची ओळख करुन द्या. १५

**किंवा**

आ. संत ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा परामर्श घ्या.

प्र. ३ अ) संत एकनाथांच्या वाङ्मयातील विविधता साधार स्पष्ट करा. १५

**किंवा**

आ) संत तुकारामाच्या अभंगवाणीतील आत्माविष्काराचे स्वरुप स्पष्ट करा.

प्र. ४ अ) पंडिती काव्याचे वेगळेपण त्याच्या स्वरुप-वैशिष्ट्याच्या आधारे स्पष्ट करा. १५

**किंवा**

आ) मुक्तेश्वर व मोरोपंत या पंडित कवींच्या साहित्याचा परिचय करुन दया.

प्र. ५ अ) पुढीलपैकी **कोणत्याही पाच** प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. १०

१. मराठीतील कोणत्याही दोन शिलालेखांची नावे लिहा.
२. ‘पूजावसार’ या ग्रंथाचा कर्ता कोण ?
३. ‘नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीपलावू जगी । ’ ही रचना कोणीची आहे ?
४. ‘येग येग विठाबाई। माझे पंढरीचे आई।’ ही अभंग रचना कोणीची आहे ?
५. नाथपंचकातील कोणत्याही दोन कवींची नावे लिहा.
६. संत तुकारामांचे पूर्ण नाव लिहा.
७. वामन पंडितांच्या दोन ग्रंथाची नावे लिहा.
८. ‘केकावली’ या ग्रंथाचा कर्ता कोण ?

**Turn Over**

munotes.in

ब) पुढील प्रश्नांसमोरील योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. ५

१) चक्रधर स्वामींचे _______ हे गुरु होत.

क. म्हाइंभट | ख. गोविंदप्रभू
ग. श्रीकृष्ण चक्रवर्ती | घ. केशिराज बास

२) आद्य कवियित्री म्हणून _______ हिचा उल्लेख केला जातो.

क. मुक्ताबाई | ख. वेणाबाई
ग. जनाबाई | घ. महदंबा

३) सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे ।। ही अभंग रचना _______ या संताने केली आहे.

क. ज्ञानेश्वर | ख. संत तुकाराम
ग. संत एकनाथ | घ. संत नामदेव

४) 'गीतार्णव' या ग्रंथाचे लेखन _______ यांनी केले आहे.

क. रामा जमार्दन | ख. विठू रेणुकानंदन
ग. दासोपंत | घ. जनी जनार्दन

५) दमयंती स्वयंवर या काव्याची रचना _______ यांनी केली आहे.

क. मोरोपंत | ख. रघुनाथ पंडित
ग. वामन पंडित | घ. सामराज

———————

munotes.in